अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर

वाचले :-

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी यांचा दिनांक २६/०४/२०२३ रोजीचे पत्र
२) तहसिलदार शाहूवाडी यांचेकडील क्र.जमीन/वशी/४५७/२०२३ दिनांक ०४/०५/२०२३ अन्वये अहवाल
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.पिएलएन-२०१७/सीआर-(११९०)/नि-३ मंत्रालय मुंबई दिनांक २९/०६/२०१७ अन्वये प्रशासकिय मान्यता
४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई दिनांक ३१ डिसेंबर २०१५
५) इकडील आदेश क्र.कार्यासन क्र.३ड/आरआर/४६१/२१ दिनांक १२/०८/२०२१

---

क्र.कार्या.३-अ/जमिन मागणी/एसआर/१५८/२३
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
स्वराज्य भवन,नगाळा पार्क कोल्हापूर-१४६००३
दिनांक :-०८/०५/२०२३

**-: आदेश :-**

ज्या अर्थी,कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी यांनी वाचले क्र.१ अन्वये, सिंधुदुर्ग जिल्हयातील शिवापुर शिरशिंगे रस्ता रा.मा.१९० कि.मी. ६८/६५० ते ७२/६५० मध्ये सुधारणा व रूंदीकरणा मध्ये वन जमिन क्षेत्र बाधीत होत असुन त्यास पर्यायी जमीन सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये उपलब्ध नाही. उपवनसंरक्षक,कोल्हापूर यांनी मौजे-मांजरे ता.शाहूवाडी येथील गट नं.४७ सरकारी मुलकीपड जमीन पर्यायी क्षेत्र म्हणुन वनविभागाकडुन निच्छीत केलेली असुन उपवनसंरक्षक,कोल्हापूर व वनक्षेत्रपाल पेंडाखळे यांनी सदर क्षेत्राची पहाणी केलेली असुन सदर क्षेत्र रोपवन करणे करीता योग्य असल्याने प्रमाणपत्र ९ व १० या विभागाकडून वनविभागामार्फत प्राप्त झालेले आहे. तरी मौजे-मांजरे गट नं.४७ मधील क्षेत्र ३ हे.७० आर क्षेत्र उपलब्ध असुन पयांयी क्षेत्र म्हणुन वनविभागास देण्याबाबत विनंती केली आहे.

तहसिलदार शाहूवाडी यांनी वाचले क्र.२ अन्वये, कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग यांनी मौजे मांजरे ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर येथील जमीन गट नं. ४७ मधील क्षेत्र ३ हे.७० आर जमीन वनविभागास हस्तांतरीत करणे हरकतीचे नाही.असा अभिप्राय दिलेला आहे.

तसेच वाचले क्र.३ अन्वये, सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी तालुक्यातील कनेडी कुपवडे शिवापूर शिरशिंगे कलंबिस्त सांगेली धवडकी दाणोली बांदा रस्ता,कि.मी. ६८/०० ते ७६/३०० मध्ये सुधारणा व २ वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे (रामा-१९०) या रूपये २,३८,००,०००/- अंदाजित खर्चाच्या बांधकामास याव्दारे प्रशासकींय मान्यता दिलेली आहे.

त्या अर्थी वाचले क्र.४ अन्वये महसूल व वन विभाग कडील शासन अधिसूचनेमधील तरतुदीनुसार व वाचले क्र.५ अन्वये दिले अधिकाराचा वापर करून मी,संजय शिदे,अपर जिल्हाधिकारी कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्हयातील शिवापुर शिरशिंगे रस्ता रा.मा.१९० कि.मी. ६८/६५० ते ७२/६५० मध्ये सुधारणा व रूंदीकरणा मध्ये वन जमिन क्षेत्र बाधीत होत असलेने त्यास पर्यायी जमीन मौजे-मांजरे ता. शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील गट नं. ४७ एकुण क्षेत्र ४२ हे.८५ आर पैकी सरकारी मुलकीपड क्षेत्र ३४ हे.९४ आर मधील ३ हे.७० आर जमीन महाराष्ट्र शासन वन विभाग यांना उपलब्ध करून देणेबाबत (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम-१९७१) मधील नियम ५ व ६ मधील तरतूदीनुसार तसेच वाचले क्र.४ मधील शासन अधिसूचनेतील परि.क्र.३ (ब) अन्वये भोगाधिकार मुल्य रहीत व सारामाफीने, मागील बाजुस नमुद केले अटी व शर्तीवर सदर जमिनीचा ताबा देण्यात येत आहे.

**( अटी व शर्ती मागे पहाव्यात )**

आवक क्र. ११८४/१९/१२३
दिनांक १९ MAY 2023
टपाल क्रमांक........ स्वाक्षरी

अटी व शर्ती :-

१. वन विभाग विषयांकित शासकीय जमीन वर्ग केल्यानंतर सदर जमिन भोगवटदार वर्ग-२ या धारणाधिकाराने धारण करील.
२. सदर क्षेत्र वनविभाग यांचेकडे वर्ग झाले नंतर, त्यास भारतीय वन कायदा-१९२७ चे कलम २० अन्वये घोषीत करणेत येवून संरक्षीत करणेत यावे.
३. वनविभाग हे विषयांकित शासकीय जमिनीचा वापर केवळ मंजुर प्रयोजनासाठी करतील अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा त्याचा कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरूपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.
४. जमिनीचा ताबा देण्यात येत असल्यामुळे जमिनीवरील अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदार वन विभाग कोल्हापूर यांची राहील.सदरील जमीनीचा वापर विहीत कालावधीत करणे बंधनकारक राहिल.
५. ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली आहे,त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करावयाचा नसल्यास सदर जमीन शासनास परत करावी लागेल.
६. प्रस्तावित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागानी निर्गमीत केलेले आदेश/सुचना या प्रकरणी बंधनकारक राहतील व त्यानुसारच आवश्यक खबरदारी/काळजी घेणे बंधनकारक राहील.
७. प्रस्तावीत प्रयोजनामुळे लगतच्या खातेदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.यांच्या वैध वहिवाटेस बाधा येणार नाही तसेच सदर जागेस पोहच रस्ता उपलब्ध करण्याची कार्यवाही वनविभाग कोल्हापूर यांनी करणे आवश्यक राहील.
८. शासकीय जमिन मंजूरी संदर्भातील इतर नियमीत अटी या ठिकाणी लागू राहतील.
९. प्रस्तुत जमिनीचा ताबा देण्यापुर्वी राज्य शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अभिप्रमाणीत हमीपत्र व शासनाचे महसूल व वन विभागकडील परिपत्रक क्र.संकीर्ण०५/२००६/प्र.क्र.४३/ज-१/दिनांक ३१/१०/२००६ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत करारनामा करून घेणे बंधनकारण राहील.
१०. शासन परिपत्रक क्र.जमीन ०८/२०१२/प्रक्र ५१/ज-१ दिनांक २३/१०/२०१२ अन्वये शासकीय जमीन विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे नियम ४९ अन्वये जमीन मंजूरीचा नमुना क्र.१८ चा कायमस्वरूपी बोर्ड प्रत्यक्ष जागेवर लावणे बंधनकारक राहिल.
११. उपरोक्त अटी व शर्तींचा भंग केल्यास जमिन शासन जमा करणेस पात्र राहील.

अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर

सही/-
( संजय शिंदे )
**अपर जिल्हाधिकारी**
**कोल्हापूर**

**प्रति,**

१) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग सावंतवाडी,जि.सिंधुदुर्ग
२) उपवनसंरक्षक कोल्हापूर यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव

**प्रतिलिपी,**

१. मा.उपसचिव,महसूल व वनविभाग मंत्रालय,मुंबई यांना महितीस्तव सविनय सादर
२. मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना महितीस्तव सविनय सादर
३. उपविभागीय अधिकारी पन्हाळा यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव
४. तहसिलदार शाहूवाडी यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरील जमीनीचा ताबा उपवनसंरक्षक कोल्हापूर यांना देवून ताबा पावती तसेच अधिकार अभिलेखात तत्संबंधीत नोंद घेऊन त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.
५. उप अधिक्षक भुमी अभिलेख शाहूवाडी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव

( संजय शिंदे )
**अपर जिल्हाधिकारी**
**कोल्हापूर**

Scanned with CamScanner